
J/19. 2015-16 83

# Educreator Research Journal (ERJ)

A Multidisciplinary Quarterly Print/online Peer Reviewed

ISSN 2394-8550

Vol II Issues I



Managing Editor
Ms.Pramila D Thokle

Chief-Editor
Ubale Amol Baban

Aarhat Publication

108,Gokuldham Park, Dr.Ambedkar Chowk, Near TV Tower, Badlapur(E),421503
Email ID:aarhatpublication@gmail.com • Ph.: 9822307164

Scanned by CamScanner

| | | | |
|---|---|---|---|
| 13 | Career Maturity Of Secondary School Tribal Students In Relation To Their Gender | Amulya Kumar Acharya | 89 - 96 |
| 14 | हैद्राबाद मुक्तिसंग्रामात 'मराठवाडा' वृत्तपत्राची कामगिरी | प्रा.डॉ.प्रशांत देशमुख | 97 - 106 |
| 15 | Necessity Of Sex Education In Our Institutions | Baria Ela T | 107 - 110 |
| 16 | भगवान बुद्ध की अमूल्य धरोहर : विपश्यना ध्यान | शिव प्रसाद पाँचे | 111 - 114 |
| 17 | स्त्रियांचे कथा आणि कादंबरीलेखन : शोध स्त्रीप्रतिमेचा | डॉ. आशुतोष पाटील, | 115 - 124 |
| 18 | Cultural Role Of Ganikas (Courtesans) In Ancient India | Vilas S. Jadhav &.Saharda G.Bande | 125 - 129 |


Peer Reviewed

Scanned by CamScanner

# हैद्राबाद मुक्तिसंग्रामात 'मराठवाडा' वृत्तपत्राची कामगिरी

**प्रा.डॉ.प्रशांत देशमुख**

आ.र.भा.गरुड कॉलेज शेंदुर्णी

ता.जामनेर जि.जळगाव

'मराठवाडा' दैनिकाचे संस्थापक आ.कृ.वाघमारे होते. हैद्राबाद संस्थानातील तरुणांच्या मनाच्या वेदनांना वाचा फोडणार वर्तमानपत्र 'मराठवाडा' होते. हैद्राबाद संस्थानांत असणा-या सामाजिक असंतोषावर धारदार लेखणीद्वारे मराठवाडयातून लिखाण आ.कृ.वाघमारेंनी केले. मराठवाडयातील आ.कृ,वाघमारेंचे लिखाण तरुणांना आणि संस्थानातील मराठी भाषिकांना आकर्षित करे. मराठवाडयाचे सामुदायीक वाचन होते असे. निर्भयपणे संस्थानातील परिस्थितीची माहिती देणारे वर्तमानपत्र मराठवाडा लोकप्रिय होते. तसे ते सरकारी रोषालाही बळी पडले. महाराष्ट्र परिषदेचे पहिले अधिवेशन परतूर,(पूर्वीचा परभणी) जिल्हा जालना येथे दिनांक २/४ जून १९३७ ला झाले. या अधिवेशनात पूर्वी पासून स्वामी रामानंद तीर्थ,दिगंबरराव बिंदू यांचा परिचय सामाजिक कार्यातून १९३५-३६ पासूनचा होता. कोणतीही व्यक्तिगत महत्वाकांक्षा नसणारे हे त्रयी परतूरच्या अधिवेशनात एकत्र आले. महाराष्ट्र परिषदेच्या परतूरच्या अधिवेशनात ३४ ठराव सामाजिक, आर्थिक,शैक्षणिक आणि धार्मिक अनुषंगाने संमत झाले ठराव क्र.४ जिल्हानिहाय सरकारी वाचनालये व पुस्तकालये उघडून मराठी भाषेतील ग्रंथ व नियतकालिके ठेवण्याची व्यवस्था ग्रंथालयात करण्यात यावी व खासगी संस्थास यांसदर्भात सहाय्य करण्यात यावे असा तो ठराव होता. तर ठराव क्र. ९ वर्तमानपत्रे व छापखाने यासंबंधी हल्लीचे नियम जाचक व अनिश्चित स्वरुपाचे आहे ते रद्द करण्यांत यावेत. तर ठराव क्र.१८ नुसार मराठीच्या उन्नतीसाठी मराठवाडयातील जनतेने रोजच्या बोलीत व्यवहारासत व पत्रोपत्री शुध्द मराठी भाषेचाच उपयोग करावा असे सुचविले होते.(१)

आ.कृ,वाघमारे हे मुळत : सिंडोना जिल्हा.औरंगाबाद येथील पटवारी होते. असलदार पटवारी ५० रु. वार्षिक वेतनाची आ.कृ.वाघमारेंकडे वतनदारी होती. आ.कृ.वाघमारेंनी हैद्राबाद संस्थानातील परिस्थिती बाबतचे लिखाण कठोर शब्दांत उपसंपादक म्हणून निजाम विजयमध्ये असतांना नोंदवले होते. निजाम विजयचे आ.कृ,वाघमारे सात महिने उपसंपादक होते.(२)

आ.कृ.वाघमारे हे लोकमान्य टिळकांचे अनुयायी होते. लोकशाही राष्ट्रीय विचारांना आ.कृ.वाघमारेंवर प्रभाव होता. लोकसंघटनेवर त्यांचा विश्वास होता. लोकांची मने आंदोलनासाठी पेटवण्यासाठी लिखाणांतून मातृभाषा,मातृभूमि, स्वाभिमान आणि लोकसंघटनेवरील विश्वास या चार मुद्दांचा उपयोग त्यांनी लिखाणात केला.(३)



Scanned by CamScanner

आ.कृ.वाघमारेंनी लोकशक्ति,महाराष्ट्र,तरुणभारत,मातृभूमी,निजामविजय,मराठा इत्यादी वर्तमानपत्रातून लिखाण केले. हैद्राबाद संस्थानातील संख्या आणि कार्यकर्त्यांशी इ.स.१९२६ पासून आ.कृ.वाघमारे संपर्कात होते. औरंगाबादेत लोकमान्यांच्या नावाने 'बळवंत' वाचनालयाच्या स्थापनेत सहभाग होता. संस्था कार्यकर्त्यांच्या कार्याला योग्य प्रकारची प्रसिध्दी मिळविण्याच्या मार्गात अडथळे उत्पन्न होतात ही खंत आ.कृमाघमारेंना होती. म्हणून त्यांनी प्रसिध्दी मंडळाची स्वतंत्र्य योजना आखली होती.(४)

प्रसिध्दी मंडळाचा उद्देश विशेषतः संस्थ्ानांतील सर्व प्रकारच्या संस्था, चळवळी,लोकस्थिती,कार्यकर्ते व त्यांचे विचार आणि भावना यांना योग्य प्रसिध्दी देणे व देण्यास प्रयत्न करण हा होता. प्रसिध्दीसाठी स्वतंत्र साधन निर्माण करणे होईपर्यंत दुस-या साधनांचे वर्तमानपत्राचे सहाय्य घेण्यातयेईल हे हि स्पष्ट केले होते.(५)

आ.कृ.वाघमा-यांनी 'मराठवाडा' प्रारंभ करण्यापूर्वी प्रसिध्दी मंडळाची योजना 'निजाम विजय' ला कळविली होती. आ.कृ.वाघमारेंनी २१ सप्टेंबर १९२६ ला लोकशक्ति हैद्राबाद संस्थांनातील अन्यायी धोरण महाराष्ट्र या नागपूरच्या वर्तमानपत्रांतून हैद्राबाद संस्थानातील लोकस्थिती दर्शविणारे पाच लेख अनुक्रमे ३१ मे, ०७ जून, १० जून,१२ जुलै १९३६ या तारखेला लिहीले. आ.कृ.वाघमारेंनी 'महाराष्ट्र' मधुन लिहीलेले लेख हैद्राबाद संस्थानांतील निजामी शासन व्यवस्थेवर टीका करणारे होते. (६अ.)

'धार्मिक धोरणांवर झगझगीत प्रकाश' या मथळयाखाली लोकशक्तित लेख २१ सप्टेंबर १९३६ ला त्यांनी लिहीला. आ.कृ.वाघमारेंच्या लिखाणामुळे निजामाने त्यांचे पटवारी वतन आणि वेतन १५ नोव्हेंबर १९३७ ला रद्द केले.(७)

यावेळी आ.कृ.वाघमारेद्वारा प्रकाशित लेखाच्या ३४८ प्रतिही निजाम शासनाने जप्त केल्या. आ.कृ.वाघमारेंनी निजाम शासनाच्या विरोधात लिखाण न करण्याचे लिखीत आश्वासन २५ डिसेंबर १९३७ ला दिले असतांना ही निजामी अवस्थेबद्दल आ.कृ.वाघमारेंनी लिखाण केले. 'मराठा'च्या ३ मार्च १९३८ च्या अंकात हैद्राबाद संस्थानातील सर अकबर हैदरीच्यावर टीका केली. उघड टीका हे आ.कृ. वाघमारेंच्या लिखाणाचे वैशिष्ट्ये होते. आ.कृ.वाघमारेंनी बाबुराव उजळंबकरांच्या सोलापूर समाचार मधूनही लिखाण केले. मराठवाडा वर्तमानपत्र काढण्याच्या अगोदर आनंद कृष्ण वाघमारे यांनी इ.स.१९३५-३८ या काळात हैद्राबाद संस्थानातील मराठी भाषीक लोकांत संघटन करण्याच्या उद्दशाने प्रखर व टिकात्मक लिखाण निजामशाहीबद्दल केले.

हैद्राबाद संस्थानाच्याबद्दल राजकीय लिखाण करणा-या मराठी वर्तमानपत्राची आवश्यकता १९३५ पासून वाटत होती. ३-४ जून १९३७ ला निजाम प्रांतिय महाराष्ट्र परिपदेचे पहिले अधिवेशन परतूरला झाले. राजकीय संघटना,यावेळी हैद्राबादंत नव्हती व मराठी राजकीय वर्तमानपत्र ही नव्हती. त्यामुळे चळवळ ही संस्थानांत कार्यरत नव्हती. म्हणून आ.कृ.वाघमारेंनी १९३५ पासून संस्थानाबाहेरील वर्तमानपत्रांतून लिखाण केले.'महाराष्ट्र' मधुन लिहिलेल्या निजाम सरकारवरील राजकीय लेखामुळे मध्यप्रांत सरकारने 'महाराष्ट्र' कडून ५००० रु. चा जामीन घेतला महाराष्ट्र निजाम हद्दीत बंद झाला. **(८)** लिखाणासाठी आ.कृ.वाघमारे आतूर होते पण वर्तमानपत्र नव्हते. आ.कृ.वाघमारें यांनी निजाम सरकारकडे मराठी वर्तमानपत्र सुरु करण्यासाठी परवानगी मागितली होती. निजाम सरकारने २३ आक्टोबंर १९३७ ला परवानगी नाकारली होती.(९)

'महाराष्ट्र परिपदेच्या परतूरच्या अधिवेशनात आ.कृ.वाघमारेंनी मराठी वर्तमानपत्र सुरु करण्याचा मनोदय व्यक्त केला होता. आ.कृ.वाघमारेंनी मराठी वर्तमानपत्राचे नावं 'मराठवाडा' तर भा. वि. ऊर्फ मामा

होते.(१०) मुरलीधर काळे,एल.एन.अभ्यंकर,कर्वे गुरुजी व शामराव बोधनकर यांच्या आर्थिक सहकार्यातून ५००० ची रक्कम उभारुन पुण्यातून मराठवाडा चा पहिला अंक १० फेब्रुवारी १९३८ ला आ.कृ.वाघमारेंनी काढला. पुण्यात बुधवार पेठेत सरदेसाईच्या छापखान्यात 'मराठवाडा' छापला जात असे.(११)

**मराठवाडयाबद्दल** मराठी भाषीकांत औत्सुक्य व आपुलकी होती. मराठवाडयाच्या स्थापनेनंतर एक महिन्यांनी १० मार्च १९३८ ला अकोल्याहून दिगंबरराव बिंदूंनी 'अमरज्योत' काढले. दोघांचेही उद्देश एकच होते. 'मराठवाडा' राजकीय विचारासाठी तर 'अमरज्योत' हिंदुमहासभेच्या व आर्य समाजाच्या लठयाच्या पुरस्कारासाठी काठला विविध नावांने प्रसिध्द झाला. अमरज्योत श्री.के.गोळेगांवकरांनी विविध नव्यानव्या नावांनी चालवले. हिंदु महासोचा लढा इ.स. १९३९ ला स्थगित झाला व 'अमरज्योत' बंद पडले **(१२)** 'अमरज्योत' व 'मराठवाडा' बंदीनंतर एकापाठोपाठ एक नांव धारण करुन सत्याग्रहाच्या काळात कार्य केले. हा एक वृत्तपत्रीय सत्याग्रहच होता.(१३)

'मराठवाडयाच्या' पहिल्या अंकात वर्तमानपत्राचे ध्येय स्पष्ट केले होते. सात स्तंभीय संपादकीयांतून मराठी लोकांच्या मनात लढयाचे स्फुलिंग फुलविले. मराठवाडयातील आ.कृ.वाघमारेंचे लिखाण म्हणजे तोफखानाच होता. तो कधीच थंडावला नाही. 'मराठवाडयाच्या' प्रथम वर्धापन दिनांच्या संजीवनी च्या अंकात १३ फेबुवारी १९३९ ला निवेदन 'आभार, व क्षमा' या अग्रलेखात मराठवाडयाच्या प्रथम अंकात व तद्नंतर स्पष्ट केलेले धोरण व दिलेले अभिवचने सामर्थ्याने पालन केले आहेत. जातीयतेवर प्रसंगानुससर अनेक कठोर प्रहार सरकारने केले. त्यामुळे होणारे नुकसानही आनंदान वर्तमानपत्राचे सहन केले. तथापि हैद्राबाद सरकारला मराठवाडयाची भूमिका जाती - पंथ निरपेक्ष असल्याचे पटले नाही व ते कधीकाळी पटेल अशी आशा करावयासही आधार नाही असे लिहीले. **(१४)**

मराठवाडा पुण्याहून काढण्याचा हेतू नमूद करतांना लिहिले की, निजामाने प्रेस ॲक्ट मध्ये नमूद केलेल्या 'राजकीय' 'जातीय' 'क्रांतीकारक' 'अराजक' या शब्दाच्या व्याख्या स्पष्ट कराव्यात. मराठवाडा वर्तमानपत्र तत्काळ वर्तमानपत्रावरील संस्थानातील बंधने मान्य करावयास तयार आहे. शासनाने २३ आक्टोंबर १९३७ ला 'मराठवाडा' सुरु करण्यास परवानगी नाकारली. परवानगी नाकारण्याचा खुलासा शसनाने द्यावा व मराठवाडयाने मर्यादा सोडून लिखाण केले म्हणून न्यायासनापूढे उभे करुन शिक्षा देणे शासनाला शक्य होवू नये म्हणून 'मराठवाडा' संस्थानाच्या हद्दीबाहेरुन प्रकाशित करावा लागला.(१५)

आ.कृ.वाघमारे 'मराठवाडा' पुण्यातील लोभनीय स्वातंत्र्यात निघतो आहे पण यापेक्षा हैद्राबादेंतील मर्यादीत स्वातंत्र्य मराठवाडयाने आनंदाने स्वीकारले असते, अशी खंत ही व्यक्त केली होती.(१६)

'मराठवाडा' च्या मुखपृष्ठावरच **हैद्राबाद संस्थानच्या प्रश्नासाठी वाहिलेले वर्तमानपत्र** असे ठळक अक्षरांत नमूद असे. मराठवाडा दर गुरुवारी प्रकाशित होत असे. हैद्राबाद संस्थांनात शुक्रवार ही सार्वजनिक सुट्टी होती. त्यामुळे मराठवाडयाचे वितरण आणि वाचन मोठया प्रमाणात शुक्रवारी होत असे. सामुदायिक वाचन मराठवाडयांचे होत असे. निजाम शासनव हद्दीत आलेल्या मराठवाडयाच्या अंकाबाबत शनिवार व रविवारी बंदीचा निर्णय घेत असे तर आ.कृ. वाघमारे ब्रिटिश शासनांकडून(१७) नवीन नावांने मराठवाडा साप्ताहिकाला परवानगी घेत व गुरुवारी नवीन नांवाने मराठवाडा वर्तमानपत्र प्रकाशित होई व हैद्राबाद संस्थानात वितरीत केले जाई.



A Multidisciplinary Quarterly Peer Reviewed

Scanned by CamScanner

निजामहद्दीत बंदी घातलेल्या मराठवाडयाचा अंक आ.कृ.वाघमारेंनी कधीहि संस्थानात पाठविला नाही. १० फेब्रुवारी १९३८ ला मराठवाडयाचा पहिला अंक निघाला. निजामाने बंदी घालताच 'नागरिक' नांवाने मराठवाडयाचा अंक छापला. मराठवाडयांची क्रांतीकारी, असंतोष निर्माण करणारी भाषा निजामाला मानवणारी नव्हती. म्हणून मराठवाडयावर बंदी घालण्यात आली. एक नव्हे 'मराठवाडा, नागरीक,संग्राम, रणदुंदुभि, समरभूमि, हैद्राबाद, स्वराज्य, मोगलाई, 'कायदेभंग, सत्याग्रह कायाकल्प'आणि 'संजिवनी' हया नावाने 'मराठवाडा' निघाला.

या अंकातून मोराची पीसे लावलेला डोंब कावळा हैद्राबाद सरकारने 'मराठी कायदेभंगाला आव्हान', 'हैद्राबादचा नाजूक प्रश्न', 'शैक्षणिक सुधारणांची गोगलगाय' (सर्व मराठवाडा) हे संपादीकीय लेख निजाम राजवटीवर प्रहार करणारे होते. मराठवाडयातील अग्रलेखांचे शिर्षकच निजाम शासनाला आव्हान देणारे होते. संपादकीय लेख न देता वर्तमानपत्र अपवाद वगळता आ.कृ.वाघमारेंनी वाघमारेंनी काढले. हैद्राबाद संस्थांनात उस्मानिया विद्यापीठात आणि विवेक वर्धिनीत मराठवाडयातील लेखाचे सामदायिक वाचन होत असे. मराठवाडा रोखठोकपणे संस्थानंातील परिस्थितीची माहिती देत राहिल्याने हैद्राबादेत 'मराठवाडा' अल्पावधित लोकप्रिय हि झाला पण शासकीय रोषालाही बळी पडला.

मराठवाडयातील धारदार लेखणी आणि संस्थानातील राजकीय चळवळींसाठी निर्माण होत असलेले वातावरण यांच्या संगमात काळ १९३८ हा होता. मराठवाडयाने मराठवाडयात हैद्राबाद संस्थांनात राजकीय लढयाला पुरक वातावरण व निर्मिती घडवीली.हैद्राबाद स्टेट कॉंग्रेसची स्थापना होण्यापूर्वीच हैद्राबाद स्टेट कॉंग्रेसवर बंदी घालण्यात आली. २४ आक्टोबर १९३८ ला हैद्राबाद स्टेट कॉंग्रेसने लढा घोषीत केला. हैद्राबाद स्टेट कॉंग्रेसवर बंदी घालताच निजामाच्या धोरणाचा उल्लेख पावसाळी पाण्याने वाढलेली परसातील भाजी आहे. कोणा ही मुलांमुलीकडून सहज खुडवावी.शिजवावी, व पचवावी। या शब्दांत केला.(२०)

हैद्राबाद स्टेट कॉंग्रेसच्या लढयासाठी 'मराठवाडा' हे वर्तमानपत्र पूरक होते. हैद्राबाद स्टेट कॉंग्रेसला बंदी -समरभुमि कायदेभंगाकडे ,कारागृह, दरवाजे उघडा,तरुण वर्ग करणार ? (रणदुदुंभि) सत्याग्रह सुरु झाला. (सत्याग्रह)ट स्टेट कॉंग्रेस दिन ,संजीवनी, या मथळयांखाली अग्रलेख लिहिले. नोव्हेंबर १९३८ पर्यत मराठवाडयाच्या १० नावांवर निजामाने बंदी घातली. नोव्हेबर १९३८ ला संजीवनी नावाने आ.कृ.वाघमारे वर्तमानपत्र काढले. हैद्राबाद स्टेट कॉंग्रेसच्या लढयाच्या प्रसारासाठी वर्तमानपत्र राहावे म्हणून संपादकीय विना संजीवनीचे अंक आ.कृ.वाघमारेनी छापले. निजामशासनास त्यामुळे संजीवनीला बंदी घालणे अवघड झाल्याने पोलिसांकरवी स्थानिक अडथळे 'संजीवनी' ला निर्माण करण्यात आली.(२१)

हैद्राबाद संस्थानात हैद्राबाद स्टेट कॉंग्रेसच्या लढयाच्या धुमसता अग्नी पेटविण्यासाठी मोकळया वा-याची वाट मराठवाडयाने आपल्या भूमिकेने निर्माण केली. कठोर शब्दाचा वापर मराठवाडयाने केला. तडजोडीच्या लवलेश कधीही मांडला नाही. कर्तव्यासाठी कठोरता धारण केली. कठोर शब्दामुळे कांहीच्या भावना दुखावल्या गेल्या तरी लोककल्याण हाच हेतू या मागचा आहे व यासाठी केवळ काळ व निजाम संस्थानातील परिस्थितीच जबाबदार आहे म्हणून 'निवेदन, आभार व क्षमा' या संजीवनीच्या १३ फेब्रुवारी १९३९ च्या अंकात संपादकीय लिहून आ.कृ. वाघमारेंनी मराठवाडयाचा अखेरचा अंक काढला. १२ महिन्याच्या कालावधीत (१० फेब्रुवारी १९३८ ) - (१३ फेब्रुवारी १९३९) ११ नावाने 'मराठवाडा 'वर्तमानपत्र काढले. मराठी वर्तमानपत्राच्याच नव्हे तर वृत्तपत्रसृष्टीच्या इतिहासात एक विक्रमच केला.(२२)



Scanned by CamScanner

'मराठवाडा' वर्तमानपत्राचे आपला विचार प्रवाहाचा मार्ग बदलला नाही. इ.स.१९३८ -३९ च्या सत्याग्रहात मराठवाडा चळवळीचे मुखपत्र होते. चळवळीचे नेतृत्व महाराष्ट्र परिषदेच्या व्यासपीठावरुन पुढे आले. उदाहरणार्थ गोविंदराव नानल,दिगंबरराव बिंदू, स्वामी रामानंद तीर्थ, आ.कृ.वाघमारे इत्यादी. तेलंगणातील नेतृत्व बहूअंशी प्रवृत्तीने मवाळ व संघर्षाला प्रतिकूल असणारे होते तर मराठवाडयातील नेतृत्व कनिष्ठ व मध्यम वर्गातून आलेले होते. त्याला राजकीय विचाराची ठाम बैठक होती. कोणत्याही त्यागाला तयार असणा-यांचा हा वर्ग होता. आ.कृ.वाघमारे, स्वामी रामानंद तीर्थ आणि दिगंबरराव बिंदुंचा इ.स. १९३५ पासून परस्पर परिचय होता. स्वमीजींकडे लढयांचे नेतृत्व दिगंबरराव बिंदु कृतीसमितीचे अध्यक्षपद होते तर आ.कृ. वाघमारेंकडे मराठवाडा वर्तमानपत्राद्वारे कार्यशील होते.

इ.स.१९३८-३९ ला मराठवाडा सुदूर भागातून काढला जात असे. मराठवाडयाचे हैद्राबाद संस्थानांत २००/३०० अंक गूप्त पध्दतीने वितरीत होत असत. पोस्टाने मात्र अंक वितरण जास्त होई. पोस्टाने मात्र अंक वितरण जास्त होई. म्हणूनच मराठवाडयावर बंदी घालताच अंकाचे वितरण न होता मराठवाडयाचे परभारेच (बंडल्स - पुडगे ) पोस्टातून जप्त केली. (२३)

हैद्राबाद संस्थानात मराठीत राजकीय विचाराधारा परखड शब्दात मांडणा-या वर्तमानपत्रांची पूर्तता आ.कृ.वाघमारेनी केली. हैद्राबाद संस्थानातील नागरी हक्काच्या अभावी निजामाच्या जात्यंतध,एकतंत्री,अरेरावी व जुलमी राजवटीखाली अमानुषपणे भरडलेल्या प्रजेचा उल्लेख आ.कृ.वाघमारेंनी 'एक मुक्या मेंढरांचा कळप' असा केला.(२४)

**दि.१३** फेंबु्वारी १९३९ ला संजीवनीवर तीन महिन्यांची बंदी घालण्यात आली. आ.कृ.वघमारेनी वर्तमानपत्र ११ नावाने चालविले. या वर्तमानपत्रावर संपादक म्हणून वेगवेगळी नावे होती. मात्र मुद्रक,मालक,प्रकाशक, खुद्द आ.कृ.वाघमारेंच होते. १९३९ ला आ.कृ.वाघमारेंवर राजद्रोहाचा खटला चालविला. हैद्राबाद संस्थानातील देशद्रोहाचा हा पहिलाच खटला होता.(२५)दि. ८ जूलै १९३९ ला खटला सुरु झाला. नेवासकर वकिल, मोतीलाल मंत्री,माणिकचंद पहाडे इत्यादींनी या खटल्याचे काम पाहिले. दीड वर्षानंतर शिक्षा व सिंडोने जि.औरंगाबाद गावचे वंशपरंपरागत पटवारी वतन जप्त करण्यात आले.(२६)

आ.कृ.वाघमारेंनी शिक्षा भोगल्यावर संघटनात्मक कार्य केले. ०३ जुलै १९४६ ला हैद्राबाद स्टेट कॉंग्रेसवरची बंदी उठविण्यात आली व लढयाच्या दुस-या पर्वाला प्रारंभ झाला. संस्थानात आंदोलनासाठी मराठी स्वरुप धारण केले. हैद्राबाद लढयाच्या प्रश्नाबद्दल महाराष्ट्राला साहजिकच आत्मीयता होती म्हणून लढयाला आवश्यक व पूरक म्हणून 'मराठवाडा'पुन्हा प्रारंभ करण्यात आला. **(२७)**

या वेळी पुण्याऐवजी मराठवाडा मुंबईतुन प्रकाशित केला.अंतिम लढयासाठी फेंबु्वारी १९४८ ला आ.कृ.वाघमारेंनी हैद्राबाद स्टेट कॉंग्रेसच्या मुंबईतील मध्यवतीर् कार्यालयाची धुरा सांभाळली. याचवेळी गोविंदभाईंनी 'फ्रिडम'हे साप्ताहिक काढले. दि.१९ मार्च १९४८ च्या मराठवाडयाच्या अंकात मराठवाडयात पुन्हा सुरुवात करण्यामागची ध्येय-धोरण- व परिस्थितीची निकड स्पष्ट केली. सरकारी व संघटनेचाही तगादा सुरु होता. हैद्राबादेत चालु असलेल्या जनता चळवळीचे अधिकृत संकलीत व सविस्तर माहिती पुरविणारे पत्र ही आज एक गरज झाली आहे. शिवाय हैद्राबादच्या प्रश्नाला आता महत्व येवून त्याने अखील भारतीय स्वरुप धारण केले आहे. 'मराठवाडया'मुळे त्याचे खरे स्वरुप समजण्यास सहाय्य होईल अशी अपेक्षा म्हणून हे पत्र पुन्हा सुरु करीत आहोत, अशी मांडली.(२९)दि. १९ मार्च १९४८ ते १७ सप्टेंबर १९४८ या मराठवाडयाच्या द्वितीय पर्व वाटचालीत द्व मराठवाडयाने



Scanned by CamScanner

अविष्कार स्वातंत्र्य गमावले नाही. हैद्राबाद स्टेट कॉंग्रेसच्या नेतृत्वाखाली १९३८ ला प्रारंभ झालेला लढा १७ सप्टेंबर १९४८ ल संपला. परंतु १९३८ पासुन मराठवाडा हैद्राबाद स्टेट कॉंग्रेस अथवा कोणत्याही पक्ष संस्थाशी जखडून राहिला नाही तर पत्राने आपले विचार स्वातत्र्य कायम राखले. मराठवाडयाच्या धोरणाबाबात आ.कृ.वाघमारेंचे 'मराठवाडा' वर्तमानपत्र हैद्राबाद स्टेट कॉंग्रेसचे अधिकृत अथवा मालकीचे पत्र नाही, जरुरी प्रमाणे 'मराठवाडा' साप्ताहिक हैद्राबाद स्टेट कॉंग्रेसवर विधायक टीका करण्यास संकोचणार नाही ,असे मत होते. **(३०)**

हैद्राबाद स्ठेट कॉंग्रेसच्या यशस्वी लढयाचे श्रेय मराठवाडा मंुबईहून हैद्राबादेंत निघुन लागल्यास काही लब्ध प्रतिष्ठानी श्रेय घेण्याचा प्रयत्न केला तेव्हा आ.कृ.वाघमारेंनी हा लढा कोणा एका जाती विरुध्द नव्हता. हैद्राबाद स्टेट कॉंग्रेसच्या यशावर कोणी हक्क सांगु नये, लोकशाहीचा तो विजय आहे. हैद्राबादचा लढा शेतक-यांनी मानवी हक्क मिळविण्याकरीता निजामी राजवटी विरुध्द पुकारलेले बंड होते. असे मराठवाडयांतून खडसावून सांगितले. **(३१)**

दि.१० फेब्रुवारी १९३८ ला हैद्राबाद मुक्ति लढयाचे हे धोरण मराठवाडयाने उराशी बाळगले होते ते १७ सप्टेंबर १९४८ ला पूर्ण झाले. लोकमताच्या विचारांचा पगडा मराठवाडयावर होता. जातीय व धार्मिक चळवळीपेक्षा राजयकी चळवळ हैद्राबाद संस्थानात आवश्यक आहे हा विचार मराठवाडयाने मानला. मराठवाडा वर्तमानपत्र जनतेला स्वातंत्र्याकडे वळविण्यासाठी, मने चेतवून पेटवून प्रत्यक्ष कृतीसाठी, ती धडाडीने तयार व्हावीत याच हेतुने काढले होते. तरुणांना प्रक्षुब्ध करण्याचे सामर्थ्य आनंद वाघमारेंच्या लिखाणात होते. तरुणांची मने पेटल्यास सत्तेच्या मदाने मस्त झालेले अरेरावी सरकार प्रजेच्या अंतोषाच्या खडकावर आपले डोके आपटल्याखेरीज राहणार नाही. असे स्पष्ट करु आ.कृ.वाघमारेंनी 'मराठवाडा' काढला.(३२)

जनसामान्यांच्या अंतकरणाला भिडण्याचे काम आनंद कृष्ण वाघमारेंचे लेख करीत म्हणूनच आ.कृ.वाघमारेंची पत्रकारीता टिळक - आगरकरांच्या जातकुळीतील म्हणता येते. कै. नरहर कुरुंदकरांनी मराठवाडयाच्या कार्याची तुलना केसरीशी करतांना म्हटले आहे की, 'महाराष्ट्राच्या स्वातंत्र्य लढयात व राजकीय इतिहासात जे केसरीचे स्थान आहे त्यासारखे स्थान मरवाठवाडयाच्या राजकीय इतिहासात 'मराठवाडा' या नियतकालीकाचे आहे.'(३३)

हैद्राबाद संस्थांनात मराठी वर्तमानपत्राच्या क्षेत्रात निजाम विजयच्या स्थापनापूर्वीचा काळ ज्ञान - प्रबोधनाचा होता, निजाम विजयच्या स्थापनेचा काळ समाज प्रबोधनाचा होता तर 'मराठवाडा' साप्ताहिकांपासून संस्थानांत राजकीय प्रबोधनाचे पर्व सुरु झाले.

आ.कृ.वाघमारे मराठवाडा वर्तमानपत्राचे संपादक होते. ११ नावांने निघालेल्या मरावाडयाच्या हैद्राबाद स्त्राज्याच्या पहिल्या अंकावर संपादक म्हणून राघवेंद्र शर्मा **(३४)** रणदुदुंभिच्या दुस-या अंकावर संपादक धो.व्य. नागरसोगेकर, रणदुदुंभि (२९ सप्टेबर १९३८) मोगलाई च्या पहिल्या अंकावर राघवेंद्र शर्मा (२०आक्टोंबर १९३८) 'समरभूमि', 'संग्रामच्या,' अंकाचे संपादक धो.व्य.नवागरसोगेकर होते. हैद्राबादेतून हद्दपार केल्यानंतर पुण्यात राहून वैदिक आश्रमाची स्थापना करण्या-या राघवेंद्र शर्माचे सहकार्य आ.कृ. वाघमारेंना वर्तमानपत्र दैनिकांच्या कार्यात सतत होते.

आ.कृ.वाघमारेंवर लोकमान्य टिळकांच्या विचाराचा प्रभाव होता. त्यांनी औरंगाबादला वाचनालयाची सुरुवात करुन बळवंत वाचनालय असे नांव देण्यात आले होते. आ.कृ.वाघमारे बळवंत वाचनालयांत कार्य केले. आ.कृ.वाघमारे राजकीय सुधारणांचे पुरस्कर्ते होते. सामाजिक सुधारणेपेक्षा राजकीय सुधारणा आ.कृ. वाघमारेंना लोकामान्य टिळकांप्रमाणे महत्वाचा वाटत



Scanned by CamScanner

होत्या. म्हणूनच ब्रिटिशाच्या विरोधात केसरीत लिहिलेल्या घनाघनाती अग्रलेखांप्रमाणे आ.कृ.वाघमारेंनी मराठवाडयातून अग्रलेख लिहीले.सत्याग्रहासाठीच नव्हे तर संस्थानी जनतेवर लादलेल्या दुहेरी गुलामीतुन मुक्तता करण्यासाठी प्रयत्नांची गरज होती म्हणून 'मराठवाडा' काढण्यात आला. म्हणूनच 'मराठवाडयाचा' उल्लेख 'हैद्राबाद स्वातंत्र्य आंदोलनाचा अग्रदुत' असा करण्यात येतो.(३५)

निजामी प्रदेशांतील नागरी स्वातंत्र्यावर बंधने वाढल्यामुळे,जनआकाक्षांना महत्व न राहिल्याने असंतोषाला वाचा देणार वर्तमानपत्र हेच साधन राहिले. 'मराठवाडा' चा जन्म झाला. असंतोषाला वाचा फोडणारी महान व प्रभावशाली पत्रकारिता हैद्राबाद मुक्ति संग्रामाची शब्द संगीनच होती. मराठवाडा नियतकालीक एका गावाला किंबहूना काही गावांना जागे करण्यास पुरेसे होते.(३६)नाना पाटील यांच्या पत्रीसरकारच्या प्रभाव आणि कार्य प्रेरीत होती. ता. आष्टी.जि.बीड. येथे वेरुळ गावात अबदुल मशीद हा सशस्त्र पध्दतीने सारा गोळा करीत होता. लोकांनी त्याला कैद करुन त्याच्या पायात बेडया ठोकल्या. लोकमान्य दैनिकाने ही घटना निजामाला वठणीवर आणण्यासाठी 'संस्थानांत पत्री सरकार 'अशी प्रकाशित केली.(३७)

महात्मा गांधीजींची हत्या दिनांक ३० जानेवारी १९४८ ला झाली. या वेळी स्वामी रामानंद तीर्थ आंध्र प्रदेशात संगारड्डीच्या तुरुगात दि. २६ जानेवारी १९४८ पासून कैद होते. तेथेच त्यांना महात्मा गांधीची हत्येची बातमी कळाली. त्यानंतर स्वामी रामानंद तीर्थ यांना गुलबर्ग्याच्या तुरुगात ठेवण्यात आले.(३८) महात्मा गांधीची हत्या झाल्यानंतर हैद्राबाद संस्थानातील घटनाक्रम दु्‌तगतीने बदलला. महात्मा गांधींच्या हत्येनंतर स्टेट कॉग्रेसला असणारे पाठिंबा आणि मार्गदर्शन राहिले नाही. निजामाची प्रजा परस्पर संघर्षाची भूमिका वाढली. स्टेट कॉग्रेसच्या लढयात अहिंसा हे प्रधान तत्व होते. महात्मा गांधीच्या हत्येनंतर, स्वामी रामानंद तीर्थ यांच्या कैदेनंतर हैद्राबाद संस्थानात प्रजा आणि संस्थानिक पोलिस यांच्याकडे संयम राहिला नाही. दै.पुढारीने 'अहिंसा आणि लढा' या अग्रलेखात तेलंगणातील स्टेट कॉग्रेसच्या पुढायांच्या डळमळीत आणि जनविरोधी धोरणामुळे आणि मध्यप्रांताच्या संस्थानी खात्याने जनतेच्या विश्वासघात करण्याचे धोरण स्वीकारल्यामुळे जनतेवर शासनाचे अन्याय व अत्याचार वाढले.(३९) असे स्पष्ट केले. दै.पुढारीचे मत तत्कालीन परिस्थितीचा विचार करता योग्य होते असे दिसते.

सत्याग्रहींची कैद, हैद्राबाद स्टेट कॉग्रेसचे नेते कैद आणि महात्मा गांधीजीच्या हत्या या घटनांची जानेवारी १९४८ प्रभावित झाला. फेब्रुवारी आणि मार्च १९४८ मध्यंतरी हैद्राबाद संस्थानातील हैद्राबाद स्टेट कॉग्रेसच्या चळवळीला पुरक प्रसिध्दी देणारी पत्रकारीता व वर्तमानपत्राची आवश्यकता वाटत होती. आ.कृ.वाघमोरेंनी मार्च १९४८ ला मराठवाडा सुरु केला आणि स्टेट कॉग्रेसची चळवळ सामान्यापर्यंत पोहचविली.

**'मराठवाडा' वर्तमानपत्राचा पुन्हा प्रारंभ :-**

आ.कृ. वाघमारेंनी १९३६ पासून लिहिलेले संपादकीय लेख म्हणजे स्वातंत्र्यपूर्व कालखंडात मराठवाडयातील लोकमानस व्यक्त कणारे आणि राजकीय चळवळ व सामाजिक घटकांचा साक्षात इतिहासच आहे.(४०) आ.कृ.वाघमारेंनी मराठवाडयातूनच केवळ संघर्षाची भूमिका मांडली नाही तर त्यांनी राजकारणाबरोबर आर्थिक ,शैक्षणिक व सामाजिक अशा विविध विषयावर लेखन केले. आपल्या लिखाणाचा रोख निजाम आणि निजाम राजवट असाच ठेवला.(४१) हैद्राबाद स्टेट कॉग्रेसवरील बंदी उठविल्यावर



Multidisciplinary Quarterly Peer Reviewed

Scanned by CamScanner

हैद्राबाद संस्थानात आंदोलनाच्या जागृतीसाठी एखाद्या मराठी वर्तमानपत्रांची आवश्यकता होती व परिस्थितीही अर्थातच निकडीची होती.हैद्राबाद स्टेट कॉंग्रेसच्या आंदोलनामुळे प्रश्नाला महत्व प्राप्त झाले होते व लढयाला भारतीय स्वरुप प्राप्त झाले होते. हैद्राबादच्या लढा संस्थानापुरता मर्यादित न राहाता तो अखिल भारतीय व्यासपीठावरचा प्रश्न बनला होता. महाराष्ट्राला या प्रश्नाबद्दल साहजिकच आत्मियता वाटत होती व हैद्राबाद प्रश्नाची उत्सुकता वाढत होती आणि ती कायम ठेवणे व अधिक रुजविणे आवश्यक होते म्हणून 'मराठवाडा' पुन्हा प्रारंभ करीत आहोत असे आ.कृ. वाघमारेंनी 'मराठवाडयाच्या' पहिल्या अंकात नमूद केले.(४२)

मराठवाडयाने इ.स.१९३८ च्या लढयात महत्वाची भूमिका पार पाडली. १९३८ च्या लढयावेळी मराठवाडा पुण्यातुन प्रकाशित होत होता. त्यावेळी हैद्राबाद संस्थानात जनता आणि राजकारण यांचे बीज अंकुरत होते. प्रांतात कॉंग्रेस व लिगची संयुक्त सरकारे अस्तित्वात होती. व त्यासचे पडसाद हैद्राबाद स्टेट कॉंग्रेसच्या सत्याग्रहींच्या सुटकेच्या वार्ता लोकांपर्यत पोहचवून 'मराठवाडा' बंद झाला'मराठवाडा' अंतर्धान झाला त्यावेळी चळवळी व हैद्राबाद स्टेट कॉंग्रेसवर बंदी होती. 'मराठवाडा' पुन्हा सुरु झाला त्यावेळी हैद्राबाद स्टेट कॉंग्रेसचा पुनर्रजन्म होवून चळवळीही सुरु झाल्या होत्या. जन्म, मृत्यु आणि पुनर्रजन्म अशा कालचक्र सिध्दांतात मराठवाडयांचे संस्थानातील जनता आंदोलनाची वाटचाल पहिली व आंदोलनाला उमीर् देण्याचे कामही केले. हैद्राबाद स्टेट कॉंग्रेस हिंदु महासभा, आर्यसमाज, वंदेमातरम् चळवळींना लोकपाठिंबा मिळवून देण्याचा प्रयत्न 'मराठवाडयाने' केला.(४४)

दि.१९ मार्च १९४८ ला हैद्राबाद स्टेट कॉंग्रेसच्या लोक लढयासाठी प्रचार,प्रसार,जागृति,आणि सदस्यांना मार्गदर्शनासाठी म्हणून 'मराठवाडा' पुन्हा प्रारंभला.(४५) मुंबईहून मराठवाडा प्रकाशित झाला. हैद्राबाद स्टेट कॉंग्रेसचे कार्यालय मुंबई प्रदेश कॉंग्रेस समितीच्या कार्यालयात स्थापन करण्यात आले होते. यावेळी मुंबई प्रदेश कॉंग्रेसचे अध्यक्ष. स.का.पाटील होते. हैद्राबाद स्टेट कॉंग्रेसचे तेलंगणा, बेझवाडा,कर्नाटकात गदग तर मराठवाडयात कार्यालय स्थापण्याऐवजी कार्यालय मुंबईत होते. **(४६)** त्यामुळे 'मराठवाडा' बातम्या व वृत्तांत मिळणे सोयीस्कर होते शिवाय हैद्राबाद स्टेट कॉंग्रेसला पूरक पाठिंबा मिळवून देण्यात मराठवाडयाला सुलभता होती. मराठवाडयांचे ध्येय-धोरण आहे,असे 'मराठवाडा'ने स्पष्ट केले होते.(४७)

'मराठवाडा' मुंबईतून चालु झालु तो मुळ स्वतःचा छापखाना व स्वताःची जागा नसतांना आ.कृ.वाघमारेंची राष्ट्रनिष्ठा,देशभक्ति, आणि समर्पकवृत्ती यातून कळते. आ.कृ.वाघमारेंच्या सिडोंने जि.औरंगाबादेतील पटवारीगिरीवर आणि जमीनीवर मि. बदरुद्दीन डेप्युटी रेव्हेन्यू सेक्रेटरींनी ऑर्डर नं .०८७ तारीख १५खर्दादस १९३८ फसली द्वारे त्यांना संस्थानात येण्यास बंदी घातली व त्यांना देशद्रोही आणि राजद्रोही ठरवले.घरादारावर तुळशीपत्र ठेवून संस्थान संघ शासनात सामिल व्हावे म्हणून सत्याग्रह हैद्राबाद स्टेट कॉंग्रेसचे संघटक पुर्ण वेळ कार्यकर्ता,वाचनालयात सेवा,सत्याग्रहात सहभाग आणि कैद स्विकारली. 'मराठवाडया'चा प्रारंभ करण्यासाठी आ.कृ.वाघमारेनी सर्वतोपरी छपाईसाठी सहाय्यता प्र.के.अत्रेनी दिली.(४९)

मुंबईहून 'मराठवाडा' गुप्तरीतीने हैद्राबादला पाठविला जात असे. निजाम शासनाचे वृत्तपत्रांसंबधी धोरण मवाळ नव्हते - बदलले नव्हते. उलट धोरणे इ.स.१९४७-४८ च्या हैद्राबाद स्टेट कॉंग्रेसच्या लढयाला महायुध्दकालीन धोरणापेक्षा अधिक कणखर



Scanned by CamScanner

आणि खुनशी बनले होते. (५०) महाराष्ट्रातील (मराठवाडा-उर्वरित) कॉंग्रेस पक्षाने 'मराठवाडया'ला बहूमोल मदत केली. राजकीय समस्या, पारतंत्र्य,प्रतिकुल जीवघेणी परिस्थिती तसेच चिंता ही वर्तमानपत्र आणि संपादकाच्या जीवनात अडथळे होती.(५१)

आ.कृ.वाघमारेंच्या कार्याचे मोल सांगणारा मराठवाडा औरंगाबादेतून दैनिक रुपात १९६० पासून प्रसिध्द होवू लागला.त्याच्या एक दिवस अगोदर आ.कृ.वाघमारेंचे निधन झाले. 'मराठवाडा' आ.कृ.वाघमोरंेनी काढला. 'मराठवाडा' हैद्राबाद संस्थानाच्या प्रश्नासाठी आ.कृ.वाघमारेंनी प्रथम पुणे नंतर मुंबई आणि पोलिस ॲक्शन नंतर हैद्राबादेतून निघाला. भाषावार प्रांत रचनेनंतर 'मराठवाडा' मराठवाडयातून मराठी भाषिकांच्या प्रश्नासाठी औरगाबादेतून निघाला. दैनिक रुपात 'मराठवाडया'चा प्रारंभ इ.स.१९६० ला झाला. दै. मराठवाडा चा पहिला अंक आ.कृ.वाघमारेंच्या दु:खद निधनवाची वार्ता देवून दैनिक रुपात प्रकाशित झाला. दैनिक मराठवाडयाचे संपादक अनंत भालेरावंनी आ.कृ.वाघमारें यांच्या मृत्युनंतर श्रध्दांजली वाहणारा अग्रलेख 'एक यज्ञकुंड नमाले'लिहिला.(५३)

यातुन आ.कृ.वाघमारेंच्या कार्याची थोरवी स्पष्ट होते.हैद्राबाद स्टेट कॉंग्रेसचा लढा आणि लढयातील विजय हा कोणा एक जातीच्या विरुध्द नव्हता. तिने मिळविलेल्या यशावर कोणी ही हक्क सांगु नये. हैद्राबाद स्टेट कॉंग्रेसने पुकारलेल्या लढयात शेतक-यांनी प्रशंसनीय कामगिरी केली. खेडयापाडयातील लाखो किसान निजामाची राजवट नष्ट करण्यासाठी झगडले. शेतक-यांनीच हा लढा चालविला. शेतक-यांनी निजामाची राजवटी विरुध्द बंड केले होते. राजकीय स्वातंत्र्य हे शोषण रहित समाज रचना कायम करण्याचे एक साधन आहे आणि राजकीय क्रांती होवून चालत नाही तर सामाजिक आणि आर्थिक क्रांतीही आवश्यक आहे. सामाजिक आर्थिक परिवर्तने झाली नाही तर शेतकरी आणि श्रमजिवी वर्ग गुलाम तो गुलामच राहील ही मुलगामी विचारसरणी आ.कृ.वाघमारेंनी मराठवाडयातून जोपासली.(५४)

आ.कृ.वाघमारेंनी 'मराठवाडा' सुरु केल्यापासून पोलिस ॲक्शनपर्यत 'आमचे ध्येय धोरण' (दि.१९ मार्च १९४८) 'हैद्राबाद वाटोळी परिषद' ( दि.२६ मार्च १९४८) 'इत्तेहादवर बंदी घातली पाहिजे'. (दि.२ एप्रिल १९४८) 'पातिव्रत्याचे प्रदर्शन' (दि.२३एप्रिल १९४८) 'हैद्राबादेंतील जनता राजकारण' (दि.४ जुन १९४८) 'हा शेवट नव्हे,आरंभ आहे.' (दि.१८ जून १९४८) 'हिंदी संघाचाविजय असा' े (दि.१७ सप्टेबर १९४८) असे कडवे अग्रलेख मराठवाडयातून लिहिले.

***संदर्भ :-***


१. जोशी,प्रा.द.पं. (संपा) *काळया पडद्याआड भाग ०३,म.सा.प.हैद्रिंबंाद २७ प्रथमावृत्ती,१९९२,पृ.३२०*

२. *मराठवाडा पुराभिलेखागार,सी.ए.रॅक. नं.९ बस्ता क्र.२०५*

३. *गर्गे स.मा. (संपा) निवडक अग्रलेख मानसन्मान प्रकाशन पुणे ०४ प्रथमावृत्ती मार्च १९९७ पृ.१९५*

४. जोशी,प्रा.द.पं. (संपा) उपरोक्त,पृ.३७४.

५. *कित्ता,पृ.३४७.*

६. *मराठवाडा पुराभिलेखागार,उ.नि*

७. *कित्ता,पृ३४७.*




A Multidisciplinary Quarterly Peer Reviewed

Scanned by CamScanner

८. मराठवाडा पुराभिलेखागार,औरंगाबाद रिव्हेन्यू डिपार्टमेंट लेटर नं.९२५. दि.२५ नोव्हेंबर १९३७,वस्ता क्र.२०५ सी.ए.रँक.नं,पृ.१५५.

९. प्रिन्सेस प्रोटेक्शन अॅक्ट १९२२ व्हॉईसरॉयनी १९२२ ला प्रेस अॅक्ट रद्द झाल्यानंतर संस्थानात संरक्षणासाठी लागू केला. संस्थानिक आणि ब्रिटिश यांच्यातील संबंधाबतच्या या कायद्यानुसार निजामशासन मराठवाडयावर बंदीची सुचना ब्रिटिशांकडे करीत असे व ब्रिटिशांनी मराठवाडयावर बंदी घातल की, मराठवाडा नविन प्रकाशित होत असे. संग्रामसंपादक धो.व्य. नागरसोगेकर, दि. ८ सप्टेंबर १९३८ पृ.०३.

१०. रमेशन,एन. (संपा) दि फ्रिडम स्ट्रगल इन हैद्राबाद खंड ०४ हिस्ट्री ऑफ द फ्रिडम स्ट्रगल इन आध्रप्रदेश स्टेट कमिटी हैद्राबाद. प्रथमावत्ती १९६६ पुनरमुद्रण १९९७ पृ.८६.

११. दि.७ फेबुवारी १९४८ ला मराठवाडा तर ७ ऑगस्ट १९४८ ला फ्रिडमच सुरुवत मुंबईत झाली. मराठवाडयाचे संपादक आ.कृ.वाघमारे तर व्यवस्थापक ललित मोहन हे वकिल होते. फ्रिडमचे संस्थापक गोविंदभाई व सहाय्यक त्रे.वी.पर्वते होते.(लेले.रा.के. मराठी वृत्तपत्रांचा इतिहास कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे३०द्वि.आ. २००४ पृ.८८७.

१२. पथी डॉ.त.व्य.प्रा.भा.ए.शिंदे संपा निवडक शोध निबंध खंड ०१ म.ई.प औरंगाबाद वर्ष १९८५ पृ.११५.

१३. गर्गे स.मस. (संपा) संघर्ष आ.कृ.वाघमारे लेख संग्रह खंड ०२ प्रकाशक प्रभाकर भा. भालेराव आ.कृ.वाघमारे स्मृती समिती औरंगाबाद प्रथमावृत्ती डिसेंबर १९८१ पृ .०७.

१४. लोकमान्य दि.२७ जानेवारी १९४८ पृ.०७.

१५. स्वामी रामानंद तिर्थ अनुवाद प्रा.वि.पा.देऊळगांवकर पूर्वोक्त पृ.२०६.

16.एक यज्ञकुंड निमाले दादा (आ.कृ.वाघमारे ) हैद्राबाद संस्थानाचे राजकारणाचे नुसते प्रणेतेनव्हते तर जनशक्तीचे कुशल संघटक होते. भल्या भल्यानंा त्यांन देशसेवेच्या प्रचाराला लावले. एक कडवे सुधारक होते त्यांचा व्यासंग प्रचंड होता. वाचनाशिवाय अन्य छंद त्यांना नव्हता. विद्वते बद्दल काय सांगावे? सातवी पास झालेला माणुस एवडे करुन जातो. हे नवलचाचेच आहे. पत्रकारम्हणून त्यांन प्रचंड कामगिरी करुन ठेवली आहे. मराठवाडयातील पत्रकारीतेला इतिहासदेणारा पत्रकार म्हणून त्याची आठवण सदैव राहिल. त्यांचा शब्दांन टनत्कार होता. त्यात घनाचा आघात होता मराठवाडा पत्राला जन्म देऊन त्यांनी हे आपले आपत्य जन्मल्याबरोबर पाशवी सत्तेच्या गृहेत सोडले आणि त्या सत्तेचे दात मोजुन घेतले. (लेले.रा.के.मराठी वृत्तपत्रांचा इतिहास .पृ.८३८.

Copyrights @ **प्रा.डॉ.प्रशांत देशमुख.**This is an open access reviewed article distributed under the creative common attribution license which permits unrestricted use, distribution and reproduction in any medium, provide the original work is cited.



Scanned by CamScanner